# नगर परिषद वरोरा
## स्वच्छता विभाग

क्रमांक : नपव/स्वच्छता/१५१/२०२६ दिनांक१४/५/२०२६

## ई-निविदा सुचना
### ( दुसरी वेळ)

वरोरा नगरपरिषद, वरोरा स्वच्छता विभागाकरीता १ वर्षासाठी खालील नमूद केलेल्या कामासाठी द्विलीफाफा पद्धतीने जाहीर ई-निविदा प्रणालीद्वारे महाराष्ट्र शासनाकडील सदर कामासाठी सक्षम नोंदणीकृत संस्थेकडून निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | बयाना रक्कम | निविदा संचाची फी रुपये | द्यावयाचा दर | कामचा कालवधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | वरोरा नगरपरिषद हददीतील श्वानांना पकडणे, त्यांचे निर्बिजीकरण करणेकामी शस्त्रक्रिया करणे, ॲन्टीरेबीज लसीकरण करणे, श्वानांना सांभाळणे, त्यांच्या अन्न व पाण्याची व्यवस्था करणे, श्वानांचा निवरागृह स्वच्छता ठेवणे व शस्त्रक्रिया उपरांत औषधोपचार करुन ज्या परिसरातुन श्वान पकडण्यात आलेले आहे, परत त्याच परिसरात सोडणे. | र.रु.१००००/- | र.रु.१०००/- | प्रती श्वान (सर्व करासहित) | १ वर्ष |

निविदा तपशील :-

| अ.क्र. | न.पा. ची प्रक्रिया | कंत्राटदाराची प्रक्रिया | दिनांक व वेळ (पासून) | दिनांक व वेळ (पर्यंत ) | लिफाफा |
|---|---|---|---|---|---|
| १. | निविदा प्रकाशित करणे. | - | दि.१५/०५/२०२६ स.११.०० वाजता | दि.२२/०५/२०२६ दु.३.०० वाजता | - |
| २. | | निविदा डाउनलोड करणे | दि.१५/०५/२०२६ स.११.०० वाजता | दि.२२/०५/२०२६ दु.३.०० वाजता | - |
| ३. | | निविदा कागदपत्रे भरणे | दि.१५/०५/२०२६ स.११.०० वाजता | दि.२२/०५/२०२६ दु.३.०० वाजता | तांत्रिक व आर्थिक लिफाफा |
| ४. | तांत्रिक लिफाफा उघडणे | - | दि.२५/०५/२०२६ दु.३.०० वाजता | - | तांत्रिक लिफाफा |
| ५. | आर्थिक लिफाफा उघडणे | - | दि.२६/०५/२०२६ दु.३.०० वाजता | - | आर्थिक लिफाफा |

१. सर्व पात्र / इच्छुक निविदाधारकांनी निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Enroll होणे आवश्यक आहे व निविदापत्रक डाऊनलोड करणेसाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. मंजूर निविदा धारकांस कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी विहीत अटी-शर्तीचा व नियमानुसार लागणारी मुद्रांक शुल्क भरुन करारनामा करणे बंधनकारक राहील.

३. निविदा स्विकारण्याचा / नाकारण्याचा / अटी-शर्ती शिथील करण्याचा / बदल करण्याचा / निविदा रद्द करण्याचा अधिकार निविदा समितीने राखून ठेवला आहे.

४. महाराष्ट्र नगरपरिषदा लेखासंहिता २०१३ ही दिनांक ११/११/२०१४ पासून अंमलात आली आहे. त्यामधील ज्या मक्तेदार / संस्थांचे दर मंजुर करण्यात येतील अशा मक्तेदार / संस्थांना कार्यादेश आरंभ च्या अगोदर सुरक्षा अनामत रक्कम म्हणून रोख / RTGS व्दारे नगर परिषद कार्यालयात जमा करावी लागेल.

५. निविदा सुचनेसोबत इतर अटी-शर्ती प्रसिध्द केले असून त्यातील तरतुदी बंधनकारक राहतील.

६. निविदा ही दोन लिफाफे पध्दतीने मागविणेत आलेली असून तांत्रिक लिफाफ्यात खालील प्रमाणे कागदपत्रे जाडावे व आर्थिक लिफाफ्यात दर नमुद करावयाचे आहेत.

अ) तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रे

१) इसारा रक्कम भरणा केल्याची पावती, निविदा अर्ज शुल्क पावती व निविदा प्रपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२) EPF, ESIC नोंदणी प्रमाणपत्र

३) सन २०२४-२५ चे संबंधित क्षेत्रात कार्यरत असलेले कर्मचारी यांचे किमान सहा महिन्याच्या ESIC आणि EPF भरल्याच्या चलनाच्या प्रती.

४) संस्था नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

५) भारतीय जीवजंतू कल्याण बोर्ड यांचेकडे नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र

६) निविदाकाराने किमान 500 श्वानांचे निर्बीजीकरण व लसीकरण केलेले असल्याचा अनुभव दाखला असणे अनिवार्य आहे.

७) निविदाकार संस्थेकडे ABC module २०२१ नुसार निर्बीजीकरण व लसीकरण करणे करिता ची महाराष्ट्रातील कोणत्याही ठिकाणाची स्वतंत्र मान्यता असणे आवश्यक आहे.

८) महानगर पालिका/ नगरपालिका क्षेत्रात किमान 1 वर्ष कालावधीचा नगरपालिका किंवा महानगर पालिका यांचे कडे संबंधित काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे व याबाबतचे कागदपत्र सादर करणे निविदाकारास आवश्यक आहे.

९) पॅन कार्ड ची प्रत

१०) मागील ३ वर्षाचे आयकर रिटर्न प्रमाणपत्र (ITR).

११) वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (GST सर्टिफिकेट)

१२) निविदा भरणाऱ्या संस्थेकडे काम करणारे कर्मचारी यांचे शैक्षणिक पात्रते बाबतचे कागदपत्र.

१३) संस्थेची नोंदणी मुंबई दुकाने व संस्था अधिनियम Public charitable trust act 1950/society registration act 1860 असलेले नोंदणी प्रमाणपत्र.

१४) निविदा भरणाऱ्या संस्थेने निविदे मध्ये सादर केलेले कागदपत्रे बिनचूक आहेत याबाबत रक्कम रु.१००/- च्या मुद्रांक शुल्कावर प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१५) निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याचे व शासनाच्या कोणत्याही विभागाचे काळ्या यादीत नाव समाविष्ट नसल्याचे रक्कम रुपये १००/- च्या मुद्रांकावर शपथ पत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१६) नगर परिषदेचे सदस्य , पदाधिकारी व अधिकारी , कर्मचारी यांचेशी हित संबंध नसल्याचे र.रु.१००/- च्या मुद्रांक शुल्कावर प्रतिज्ञा पत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१७) संस्थे कडे काम करणारे कर्मचा-यांची गुन्हेगारी पार्श्वभूमीचे किंवा प्रवृत्तीचे नसावेत. या बाबतचे स्वयंघोषणापत्र कर्मचा-याने तसेच संबधीत संस्थेने दाखल करावे.

मुख्याधिकारी
नगर परिषद वरोरा

## अटी व शर्ती

१) The Animal Birth Control Programme राबवितांना श्वान ठेवण्याकरता नगर परिषद कडुन जागा पुरविण्यात येईल.

२) निविदा स्विकारणे अथवा कोणतीही किंवा सर्वच निविदा रद्द करण्योच अधिकार वरोरा नगरपरिषद यांचेकडे सुरक्षित आहेत.

३) निधीची उपलब्धतेनुसार देयक अदा करण्यात येईल, देयक वेळेवर अदा न झाल्यास कंत्राटदारास काम बंद करता येणार नाही.

४) नामंजुर निविदा धारकाशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही अथवा त्यांना नगरपरिषदेशी पत्र व्यवहार करता येणार नाही.

५) प्राप्त होणा-या निविदेपैकी कोणतीही एक निविदा मंजुर करणे किंवा सर्व निविदा नामंजुर करणे याबाबत नगरपरिषदेकडे अधिकार राखुन ठेवण्यात येत असून त्याबाबत कारणे देणे बंधनकारक राहणार नाही.

६) कोणतेही कारण न देता निविदा फेटाळण्याचा किंवा स्विकारण्याचा अधिकार नगरपरिषद यांचेकडे ठेवण्यात येते.

७) मंजूर निविदा धारकास कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी विहीत अटी-शर्तीचा व नियमानुसार लागणारी मुद्रांक शुल्क भरुन करारनामा करणे बंधनकारक राहील.

७) मंजूर निविदा धारकास कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी विहीत अटी-शर्तीचा व नियमानुसार लागणारी मुद्रांक शुल्क भरुन करारनामा करणे बंधनकारक राहील.

८) सदर कामाकरीता वापरात येणारे वाहन आर.टी.ओ नोंदणीकृत असावे. विमा, पी.यु.सी व परवाना असणे बंधनकारक आहे.

९) संस्थेचे बँक पासबुक पुरविणे बंधनकारक.

१०) प्रत्येक महिन्याच्या बिलातून २% सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्यात येईल.

११) ई-निविदा सादर करणाऱ्या निविदाकारास या निविदेतील व निविदाधारकांसाठी विहित केलेल्या सर्व अटी-शर्ती मान्य असल्याचे मानण्यांत येईल.

१२) सदर कामाचा कालावधी १ वर्षाकरिता राहील. हा कालावधी कमी अथवा जास्त करण्याचे अधिकार नगरपरिषद यांचे राहील.

१३) ई-निविदा व त्यासोबत सादर केलेली सर्व कागदपत्रे पुर्ण भरलेली व निविदाकाराने योग्य तऱ्हेने साक्षांकित केलेली असणे आवश्यक आहे. तसेच खाडाखोड व दुरुस्ती असलेल्या ठिकाणी निविदाकाराने लघुस्वाक्षरी करुन ती साक्षांकीत करुन अपलोड करावी.

१४) निविदाकाराने निविदेत किंवा निविदेसोबत सादर केलेली कोणतीही माहिती ही अपुरी, चुकीची, अस्पष्ट असल्याचे निष्पन्न झाल्यास निविदाधारकाची निविदा रद्द करण्याची व त्यास अपात्र ठरविणे तसेच कराराच्या कालावधीत करार रद्द करणेचा अधिकार मुख्याधिकारी वरोरा नगरपरिषद, जिल्हा – चंद्रपूर यांना असेल.

१५) या ई-निविदेतील अटी व्यतिरीक्त इतर कोणत्याही अटी शर्ती नमुद केलेली निविदा विचारात घेण्यात येणार नाही.

१६) निविदाकाराने निविदेच्या प्रत्येक पानावर सर्वसाधारण अटी व शर्ती मान्य असल्याबाबत तसेच दर पत्रकावर सही न केल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही.

१७) काम बंद करावयाचे असल्यास नगरपरिषदेची पुर्व परवानगी घेणे कंत्राटदार संस्थेत बंधनकारक राहील. कंत्राटदार संस्थेकडुन कराराचा भंग झाल्यास कामे इतर संस्थेमार्फत करण्यात येईल व येणारा खर्च प्रथम कंत्राटदार संस्थेकडुन वसुल करण्याचा अधिकार नगरपरिषदेस राहील.

१८) ठरविल्या प्रमाणे कामे होत नसल्यास, खंड पडल्यास अनियमितता असल्यास, कराराचे अटीचा भंग केल्यास कारवाई करुन करार संपुष्टात आणण्याचा अधिकार नगरपरिषदेस राहील.

१९) कंत्राटदार संस्था व वरोरा नगर परिषद यांच्यात वाद उत्पन्न झाल्यास याबाबत चर्चा करुन नगरपरिषद जो निर्णय देईल तो कंत्राटदार संस्थेला मान्य करावा लागेल.

२०) पकडलेल्या श्वानांची नोंद स्वतंत्रपणे नोंद वहीत करणे आवश्यक राहील.दैनंदिन पकडलेले ठीकाण, संख्या, केंद्रात पोहोच केले बाबतची पोहोच स्वाक्षरी नोंद करणे संस्थेस बंधनकारक राहील.

२१) निर्बीजीकरण झालेनंतर श्वान मूळ जागी सोडणे संस्थेस बंधनकारक राहील.

२२) स्वतंत्र दुरध्वनी सेवा संस्थेने ठेवणे बंधनकारक राहील.

२३) वरोरा नगरपालिका हददतील श्वानांना पकडणे, त्यांचे निर्बीजीकरण करणेकामी शस्त्रक्रिया करणे, अॅन्टीरेंबीज लसीकरण करणे, AWBI नियमानुसार औषधोपचार करणे, खाज प्रतिबंधक इंजेक्शन व शस्त्रक्रियेनंतर देण्यात येणा-या औषधोपचार करण्यासाठी व निवारागृह स्वच्छ ठेवण्याची तसेच परत त्याच जागी सोडण्याची संपूर्णतः जबाबदारी ही कंत्राटददार संस्थेची राहील.

२४) संस्थेमार्फत दैनंदिन केलेल्या कामाचे संगणकीय स्वरुपात नोंदणी (Digitalization) ठेवणे संस्थेस बंधनकारक राहील. शस्त्रक्रिया केलेनंतर नगरपरिषदेकडे वेळोवेळी दैनंदिन स्वरुपात जमा करणेत आलेला ORGANS चे आधारे केलेल्या कामाचे बोल अदा करण्यात येईल.

२५)श्वानांना स्वतंत्र जाळीत पकडुनच त्यांचे वहन करावे. स्वतंत्र विभाजक असल्याशिवाय श्वानांना एकत्रितप गाडीत वाहुन नेऊ नये, जितके स्वतंत्र विभागजक/जाळया गाडीत आहेत तितकेच श्वान गाडीत वाहून नेणे बंधनकारक राहील

२६)Dog catching nets स्वच्छ व रोगजंतु मुक्त ठेवणे आवश्यक आहे.

२७) कंत्राटदाराने संस्थेच्या नियुक्त कामगारांना किमान वेतन कायदा, भविष्य निवार्ह कायदा, राज्य कामगार विमा आयोग व इतर कामगार कायदयातील तरतुदी लागु राहातील तसेच करार कालावधी मध्ये या कायदया संदर्भातील बदल यांना लागु राहतील.

२८)श्वानांचे निर्बीजीकरण कामा संबंधीत AWBI या संस्थेकडून प्राप्त होणाऱ्या ५०% अनुदानासाठी पाठपुरावा करणे बंधनकारक राहील.

२९)काम करतांना बालकामगार लावता येणार नाही.

३०) संस्थे मार्फत नियुक्त करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ओळखपत्र पुरविणे बंधनकारक राहील.

३१) संस्थेने आपले दर प्रति श्वान याप्रमाणे सर्व करांसह सादर करावे.

३२)श्वानांचे निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करण्यासाठी स्वतःचे अनुभवी डॉक्टर्स, परिचर व सहाय्यक असणे आवश्यक आहे.

३३) शस्त्रक्रिया झालेल्या कुत्र्यांची ओळख म्हणुन कुंत्र्याच्या उजव्या कानाला "V" आकारानेकापणे आवश्यक राहील.

३४)शस्त्रक्रियेसाठी आणलेल्या श्वानांचे निर्बिजीकरण प्रक्रिया करुन त्यांना परत किमान तीन दिवस देखरेखीत ठेवुन त्यांचे अन्न व पाण्याची व्यवस्था करुन, स्वस्थ श्वानांना त्याच जागी सोडणे तसेच शस्त्रक्रियेनंतर श्वान स्वस्थ नसल्यास त्यांना पुर्णतः बरे होईपर्यत औषधोपचार देऊन परत त्याच जागी सोडण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३५)शस्त्रक्रिया केल्यानंतर श्वानांचे अवयव वेगळे करुन प्रत्येक दिवशी न.पा. अधिकारी व पशु संवर्धन विभागा मार्फत नेमुण दिलेले अधिकारी यांचेमार्फत प्रमाणित करणे तसेच न.पा चे वरिष्ठ अधिकारी व पशुसंवर्धन विभागाचे अधिकरी यांचे आकस्मिक भेटी दरम्यान सदर श्वानांचे संग्रहीत अवयव दाखविणे संस्थेला बंधनकारक राहील.

३६) भटक्या श्वानांचे शस्त्रक्रिये संबंधी कोणत्याही प्रकारे तक्रारी न.पा ला प्राप्त झाल्यास त्यांच्या निराकरण करण्याची जबाबदारी तसेच पशु प्रेमी संस्थेच्या आक्षेपाचे निराकरण करुन न.पा ला अहवाल सादर करणे कंत्राटदार संस्थेला बंधनकारक राहील.

३७)सदर काम करीत असतांना संस्थेचे वाहन अथवा वाहनचालक, कर्मचारी यांचेबाबत दुखापत, इजा किंवा मृत्यु इत्यादी दुर्घटना झाल्यास नगरपालिका जबाबदार राहणार नाही.

३८)श्वान पकडतांना, श्वानांचे निर्बिजीकरण करतांना, श्वानांचा सांभाळ करतांना, श्वानांना इजा किंवा मृत्यु झाल्यास सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल. मृत श्वानाचे शव विच्छेदन करून तसा अहवाल न.प कडे सादर करणेस मक्तेदारास बंधनकारक राहील.

३९) शस्त्राक्रिये दरम्यान न.पा. चे कोणतेही अधिकारी, पदाधिकारी परिक्षण व तपासणी करु शकतील.

४०)सदर कार्यक्रम राबवित असतांना कोणत्याही वृतपत्रात प्रसिध्दी करता येणार नाही. तसेच कोणत्याही वृतपत्राच्या पत्राकारासोबत चर्चा करण्यापुर्वी न.पा.ची परवानगी घेणे अनिवार्य राहील. ABC केंद्रामध्ये न.प. च्या पूर्व परवानगी शिवाय कुणालाही प्रवेश देण्यात येऊ नये.

४१) भटक्या श्वानांचे शस्त्रक्रिया झाल्यानंतर आवश्यक वेळ/दिवसा पेक्षा जास्त देखरेखीखाली ठेवण्याची आवश्यकता पडल्यास कंत्राटदार संस्थेला ठरवुन दिलेल्या दरापेक्षा जास्त रक्कम किंवा इतर खर्च देण्यात येणार नाही.

४२)न.पा. अधिकारीव्दारे वेळोवेळी देण्यात आलेल्या सुचनांची अंमलबजावणी करणे कंत्राटदार संस्थेला बंधनकारक राहील.

४३)मंजूर निविदाधारक यांना कार्यादेश प्राप्त झाल्या नंतर ६ महिन्याच्या आंत ABC module २०२३ नुसार ABC PROGRAMME करीता AWBI यांचेकडून स्वतंत्र परवानगी प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील.

४४)The Prevention of Cruelty to Animal Act 1960, The Animal Birth Control (DOGS) Rule 2001, 2023, The Prevention of Cruelty (Capture Of animals) Rules 1979, M.M Act 1965 या कायदा व नियमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदार संस्थाची राहील.

४५)आवश्यक कागदपत्र:-

अ) नगरपालिका, महानगरपालिका मध्ये श्वानांच्या निर्बिजीकरण, शस्त्रक्रिया केल्याचा अनुभव असल्यास, सोबत कार्यदिशाची प्रत जोडणे आवश्यक राहील, करारनामा जोडणे आवश्यक.

ब) भारतीय जीव-जंतु कल्याण बोर्डव्दारा मान्यता प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र.

क) संस्था नोंदणी प्रमाणपत्र.

ड) संस्थेचे पॅनकार्ड, आयकर प्रमाणपत्र व जीएसटी सर्टिफिकेट असणे आवश्यक राहील.

४६) कामाबाबत कोणतेही वाद निर्माण झाल्यास नगरपरिषदेचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

४७) निधीचे उपलब्धतेनुसार देयक अदा करण्यात येईल.

४८)बिलावरचे सर्व शासकीय कर भरण्याची जबाबदारी निविदाधारकावर राहील. नगरपालिकेवर नाही.

४९)कामावरील कर्मचाऱ्यांना (कामाच्या कालावधीपर्यंत) विमा संरक्षण द्यावे लागेल, किमान वेतन कायदा तसेच मजुर कायदे या संबंधी अस्तित्वात असलेल्या इतर मजूर कायद्याची अंमलबजावणी करणेची जबाबदारी मक्तेदाराची राहील.

५०)सदर काम समाधानकारक न आढळून आल्यास आपला ठेका रद्द करण्यात येईल.

५१)कोणत्याही कारणामुळे मक्ता रद्द झाल्यास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मक्तेदारास न.पा.कडे मागण्याचा हक्क अथवा अधिकार राहणार नाही.

५२)अभिकर्त्याने ठेक्यावरील कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधी खाती, विमा काढून त्यांची वर्गणी व मक्तेदाराचे अंशदान भरण्याची जबाबदारी अभिकर्त्याची (मक्तेदाराची) राहील व कामगाराच्या ई.पी. एफ भरणा करुन त्याच्या छायांकित प्रती बिलासोबत जोडणे बंधनकारक राहील.

५३)निविदेत नमुद केलेले दर सर्व करांसहीत नमूद करणे मक्तेदारास बंधनकारक आहे.

५४)निविदा स्विकारण्याचा / नाकारण्याचा / अटी-शर्ती शिथील करण्याचा / बदल करण्याचा / कोणतेही कारण नमुद न करता निविदा रद्द करण्याचा अधिकार निविदा समितीस राहील, हे मक्तेदार यांना माहित आहे.

५५) निविदेमध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये काम करणे मक्तेदारास बंधनकारक आहे.

५६) काम करणे करीता अग्रिम रक्कम मागणी करता येणार नाही.

५७) शासकिय लेखा परीक्षणात आक्षेप निघाल्यास त्याची पुर्तता करणेची जबाबदारी अभिकार्त्याची राहील. लेखा परीक्षणात वसुली निघाल्यास न.पा. निर्देशानुसार त्वरीत रक्कम भरावी लागेल. तसेच आक्षेपांच्या अनुपालनासाठी आपल्याशी संबंधीत बाबींची पुर्तता करावी लागेल.

५८)निविदेच्या वैध कालावधीमध्ये नगरपरिषदेच्या संमती शिवाय निविदा रद्द केल्यास किंवा करारातील कोणत्याही अटी व शर्ती चा भंग केला असल्यास सुरक्षा अनामत जप्त करण्यात येईल.

५९)बील हिशोबातील नजरचुकीने जादा रक्कम अदा केली गेल्यास जादा रक्कम न.पा. कार्यालयात त्वरीत भरणा करावी लागेल असे न केल्यास पुढील देयकातून ती वसुल करण्यात येईल.

६०)वेळोवेळी अंमलात असलेले सर्व शासकीय कर बीलातुन कपात करण्यात येतील.

६१) यशस्वी ठेकेक़दारास योग्य किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

६२)सर्व कागदपत्रे अनुक्रमांक टाकुन अपलोड करावीत.

६३)निविदाकाराने ई-निविदा दाखल केल्यानतंर जेव्हा न.पा आर्थिक दर लिफाफा उघडेल त्यानंतर दराबाबत कोणतेही फेर फार किंवा त्याबाबत पत्र सादर करता येणार नाही कदाचित एखाद्या निविदाकाराने ऑन लाईन निविदा मुदत नंतर असे दर सादर केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

६४) नगरपरिषदेची पूर्व परवानी शिवाय मक्तेदारास काम दुसऱ्या मक्तेदारास सोपविता येणार नाही. किंवा दुसऱ्याला सब कॉन्ट्रॅक्ट देता येणार नाही. तसे केल्यास मक्तेदाराकडुन काम काढुन घेणेत येईल.

६५) मक्तेदारास अचानकपणे काम बंद करता येणार नाही काम बंद करावयाचे असल्यास नगरपरिषदेची पुर्ण परवानगी घेणे मक्तेदारास बंधनकारक राहील.

६६) झालेल्या कामाचे दरमहाचे बिल आवश्यक संपूर्ण कागदपत्रांसह नगरपरिषदेकडे प्रत्येक महिन्याच्या ५ तारखे पर्यंत सादर करावे. उशिरा झाल्यास नगरपरिषद जबाबदार राहणार नाही. उपलब्ध निधीनुसार बिल अदा करण्यात येईल. कोणत्याही परिस्थिती अग्रीम रक्कम आद केली जाणार नाही. विहित मुदतीत देयक अदा न केले गेल्यास मक्तेदारास व्याज मागणी करता येणार नाही.

६७) कोणत्याही नगरसेवकाचा निविदेमध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध नाही. जर असा कोणताही हितसंबंध दिसुन आला तर, कंत्राट रदद्बाबतल असल्याने समजण्यात येईल. नगरपरिषदेस उक्त कंत्राटाखाली केलेल्या कोणत्याही कामाच्या संबंधात रक्कम रोखण्याचा हक्क असेल.

६८)या करारासंबंधी कोणताही दावा कोणत्याही न्यायालयात झाल्यास दाव्याच्या दोन्ही बाजुचा खर्च (म्हणजे नगरपरिषदेचा खर्च धरुन) पुरवठाधारकास करावा लागेल.

६९)वरील अटी व शर्तीतील एखाद्या बाबींच्या अर्थासंबंधात वाद असल्यास त्याबाबत मुख्याधिकारी, नगरपरिषद जो निर्णय देतील तो सर्व पक्षांवर बंधनकारक असेल.

मुख्याधिकारी
नगर परिषद वरोरा

Signature Not Verified

Digitally signed by VISHAL CHANDRAKANT KAMDI
Date: 2026.05.14 15:53:01 IST
Location: Maharashtra-MH